# राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे.

फोननं. -०२०-२६०५०६४१ ई-मेल- sceapune@gmail.com

---

जा.क्र.रासनिप्रा/ड वर्ग संस्था/मा.सु./२०१४/९३०
दि.२९/११/२०१४

प्रति,
१.जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी ( सर्व)
२.तालुका सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

**विषय :- ड वर्गातील सहकारी संस्थांचे समिती निवडणूक प्रक्रियांचे संदर्भात अनुसरावयांच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना , स्पष्टीकरण:**

**संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र जा.क्र. रासनिप्रा/ड वर्ग/नि.मा.सु./५५८/२०१४, दिनांक १८/१०/२०१४.**

महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ४ मधील 'ड' प्रकारच्या सहकारी संस्थांची निवडणुक घेण्यासाठी नियम ७६ अन्वये कार्यपध्दती निर्धारित करण्यात आली आहे. सदर नियम ७६ मध्ये सविस्तर अशी प्रक्रिया दिलेली नसल्याने क्षेत्रिय अधिका-यांकडुन हयासंदर्भात शंका उपस्थित करण्यात येत आहेत. प्राधिकरणाने हयापूर्वीच 'ड' प्रकारच्या संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी सविस्तर मार्गदर्शनपर सूचना दि.१८/१०/२०१४ च्या परिपत्रकान्वये निर्गमित केल्या आहेत. नियम ७६ मधील तरतुदींच्या आधारावर व निवडणुक नियमांतील अन्य संबंधित तरतुदी लक्षात घेवून प्राधिकरणास उक्त नियमांमधील नियम ३ (v) अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन खालीलप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात येत आहे.

सर्व साधारणपणे 'ड' प्रकारच्या निवडणुकांसाठी प्राधिकरणातर्फे नियुक्त करण्यात आलेल्या प्राधिकृत अधिका-याने संबंधित संस्थेच्या विशेष अधिमंडळाच्या सभेसमोर प्रास्ताविकानंतर प्राधिकरणाचे मोकळया, भयमुक्त वातावरणात, पारदर्शक पध्दतीने निवडणुका घेण्याचे धोरण विवेचन करुन तसेच नियम ७६ मधील तरतुदी सविस्तरपणे नमूद करुन या व्दारे उपलब्ध पर्यायांची माहिती देणे सुध्दा अपेक्षित आहे व त्याअनुषंगाने अधिमंडळाकडुन निर्णय घेणे अपेक्षित असेल. सदर बैठकीत महाराष्ट्र सहकारी संस्था. (समिती निवडणुक) नियम २०१४ च्या नियम ७६ च्या प्रथम परतुंकान्वये नियम ७५ अन्वये निवडणुक घेण्याची मागणी केल्यास तसा ठराव करुन त्याची नोंदवहीत नोंद घेवून अहवाल प्राधिकृत अधिकारी / अध्यासी अधिकारी संबंधीत तालुका / वार्ड सहकारी निवडणुक अधिका-यास सादर करेल.

साधारणत: 'ड' प्रकारच्या संस्थेच्या निवडणुकांसाठी खालील प्रवर्ग असू शकतात.

| अ.क्र. | प्रवर्गाचे नाव | समिती सदस्य संख्या |
|---|---|---|
| १ | सर्वसाधारण | उपविधीतील तरतुदीनुसार |
| २ | अनु.जाती/अनु. जमाती | १ |
| ३ | इतर मागास वर्ग | १ |
| ४ | वि.जा./भ.ज./वि.मा.प्र. | १ |
| ५ | महिला | २ |

अधिमंडळ सभेकडुन उपरोक्त प्रमाणे प्रवर्गात निवडुन देण्याच्या समिती सदस्यां एवढेच उमेदवार निवडणुकीसाठी उभे राहील्यास निवडणुक ही अविरोध होऊ शकेल, तथापि काही प्रवर्गात निवडुन द्यावयाच्या सदस्य संख्येपेक्षा जास्त उमेदवार इच्छुक असल्याचे दिसून असल्यास त्या-त्या प्रवर्गासाठी मतदानाव्दारे निवडणुक घेणे क्रमप्राप्त ठरेल.

अशी निवडणुक घेताना प्राधिकृत अधिका-याने प्राधिकरणाचे "Fair and Free Elections" धोरण लक्षात घेवून निवडणुक नियमातील नियम ८० तील तरतुदीचे कटाक्षाने पालन होईल अशा पध्दतीने निवडणुक घेणे आवश्यक राहील. अशा

Scanned by CamScanner

कारची निवडणुक प्रक्रिया राबविण्याचा निर्णय सभेत झाल्यास त्या अनुसार निवडणुकीचे संक्षिप्तात वेळापत्रक प्राधिकृत अधिका-याने घोषित करणे आवश्यक ठरेल.

अधिमंडळाच्या प्रस्तुत सभेमध्ये एखाद्या उमेदवाराच्या नामनिर्देशन पत्राबाबत वाद निर्माण होवून त्याबाबतचा निर्णय होऊ न शकल्यास किंवा कलम ७३ कअ प्रमाणे अपात्रतेबाबतच्या वादाबाबत निर्णय न होवू शकल्यास अथवा अन्य कारणास्तव निवडणुक प्रक्रिया पूर्ण होवू शकत नाही अशी प्राधिकृत अधिका-याची खातरजमा झाल्यास असा अधिकारी नियम ७६ मधील दुस-या परंतुकानुसार राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण / तालुका किंवा वार्ड सहकारी निवडणुक अधिकारी हयांचेकडे निवडणुक नियम ७५ अन्वये निवडणुक घेण्याबाबत अहवाल सादर करतील.

काही सहकारी संस्थांकडुन सहयोगी सदस्यांच्या मतदानाच्या अधिकाराबाबत पृच्छा करण्यात येत आहे. हयासंदर्भात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम २७ (२) स्वयंस्पष्ट आहे. हयाबाबत सहयोगी सदस्याची व्याख्या कलम २ (१९) (ब) प्रमाणे देखील विचारात घ्यावी.

अधिमंडळाच्या विशेष बैठकीस गुप्त मतदानाची व्यवस्था कशा प्रकारे करावी याबाबतच्या संक्षिप्त मार्गदर्शनपर सुचना सोबत परिशिष्ट अ मध्ये जोडल्या आहेत. सदर सुचना केवळ मार्गदर्शनपर असून स्थानिक परिस्थिती उपलब्ध संसाधने आणि अधिमंडळ सभेचा निर्णय विचारात घेऊन अध्यासी अधिकाऱ्याने उपरोक्त नमुद परिस्थितीत ड वर्ग संस्थांच्या समिती निवडणूकांची प्रक्रिया पुर्ण करावी. असे करतांना अधिनियम, नियम , निवडणूक नियम आणि संस्थेची उपविधी यातील कोणत्याही तरतुदींचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

मा. आयुक्त राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांचे आदेशाने

(डॉ. आनंद जोगदंड) ५/११/१५

सचिव

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,

महाराष्ट्र राज्य, पुणे.

Scanned by CamScanner